सकाळ

# 'गुढीपाडव्याला 'रवळनाथ'मध्ये १ कोटी ६१ लाखांच्या ठेवी'



एम. एल. चौगुले

गडहिंग्लज, ता. २३ : गुढीपाडव्यानिमित्त श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीच्या ११ शाखांत मिळून १ कोटी ६१ लाखांच्या ठेवी जमा झाल्या. पारदर्शक कारभार, ठेवीदारांचा विश्वास आणि तत्पर सेवा यामुळे ठेवीदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देवून नव्या वर्षातील गुंतवणुकीची सुरुवात केली, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

ते म्हणाले, 'दरवर्षी गुढीपाडवा व दिपावलीनिमित्त संस्थेत गुंतवणूक करणाऱ्या ठेवीदारांची संख्या अधिक आहे. म्हणूनच यंदाच्या गुढीपाडव्यालाही ठेवींचा ओघ कायम राहिला.

आजअखेर संस्थेकडील ठेवींची रक्कम ३७५ कोटी झाली आहे. आजरा, चंदगड, गडहिंग्लज, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी, सुविधा केंद्र गडहिंग्लज, कुडाळ, सांगली या शाखांमध्ये ठेवी ठेवण्यासाठी ठेवीदारांनी प्रतिसाद दिला. याकामी उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, प्रशासन अधिकारी सागर माने आर्दींचे सहकार्य मिळाले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
24/03/2023 Page No. 3